MHKO100003512023

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.११/२०२३**

श्वेता सुरज जाधव.
//विरुध्द//
सुरज रामचंद्र जाधव वगैरे.

**निशाणी क्र.५ वरील आदेश**

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे अधिनियम २००५ असे संबोधण्यात येईल) चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे. वि.प. यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.११ येथे त्यांचे म्हणणे दिलेले आहे.

२. अर्जाचे व त्यावरील दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदार व वि.प. यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी माझ्यासमोर पुढील प्रश्न उपस्थित होत असून खालील कारणमिमांसेआधारे मी त्यांचे निष्कर्ष त्यांच्या पुढे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी अर्जदार व वि.प. यांचे दरम्यान कौटुंबिक नातेसंबंध असल्याचे दिसुन येते का ? | - | होय. |
| २. | प्रथमदर्शनी अर्जामध्ये वि.प. यांनी अर्जदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले हे दिसुन येते का ? | - | होय. |
| ३. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | - | होय.<br>अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ४. | आदेश काय ? | - | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा**

३. माननीय सर्वेच्च न्यायालय यांनी पारीत केलेल्या *Rajnesh Vs. Neha and Anr, CRIMINAL APPEAL NO. 730 OF 2020 (Arising out of SLP (Crl.) No. 9503 of 2018)* सुपुर्द दिनांक ०४/११/२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रत्येक पोटगीच्या अर्जाचे कामी प्रकरणातील दोन्ही पक्षांनी शपथेवर आपले उत्पन्न, जमा व खर्चाच्या विवरणाबाबत शपथपत्र दाखल करणे बंधनकारक केलेले आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने निशाणी क्र.६ अन्वये आपल्या उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाबाबत

शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच, वि.प. क्र.१ याने निशाणी क्र.१६ अन्वये त्याच्या उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाबाबत शपथपत्र दाखल केलेले आहे.

**प्रश्न क्र.१ करीता -**

४. अर्जदार हिने तिचे वि.प.क्र.१ याचेसोबत दिनांक ०३/०३/२०१६ रोजी लग्न झालेले असून लग्नानंतर ती वि.प. यांचेसोबत सासरी नांदण्याकरीता गेल्याचे कथन केले आहे. याऊलट, वि.प. यांनी अर्जदार व वि.प.क्र.१ यांचे लग्नसंबंध नाकारलेले आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज विचारात घेतेवेळी सर्वप्रथम अर्जदार व वि.प. क्र.१ यांचेदरम्यान अधिनियम २००५ नुसार कौटूंबिक नातेसंबंध आहे अथवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

५. अर्जदार हिने तिचे वि.प.क्र.१ याचेसोबत लग्न झाल्याचे शाबीत करणेकरीता विवाह निंबंधक कार्यालय, पुणे यांनी जारी केलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, विवाह ठरावाची यादी, विवाहाचे छायाचित्र, अर्जदार हिचे विवाहानंतरचे आधारकार्ड व अर्जदार व वि.प.क्र.१ यांचे विवाहानंतरची छायाचित्रे दाखल केलेली आहेत. सदर अर्जदारतर्फे दाखल विवाह नोंदणी पत्राप्रमाणे अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा विवाह हा दिनांक ०३/०६/२०१६ रोजी झाला असुन त्याची नोंद दिनांक ०९/०३/२०१८ रोजी करण्यात आलेली आहे. वि.प. तर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, सदर अर्जदारतर्फे दाखल विवाह नोंदणी प्रमाणपत्र मुळ नसुन त्याची प्रत आहे. तसेच, सदर प्रमाणपत्र हे खोटे व बनावट आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज हा दरम्यानच्या पोटगीकरीता दाखल केलेला असुन याघडीला अर्जदार अथवा वि.प. यांनी त्यांचे कथन सबळ पुराव्यानिशी शाबीत करणे अपेक्षित नाही. याघडीला केवळ त्यांचे कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य आहे अथवा कसे हे पाहणे आवश्यक असते. त्याप्रमाणे, अर्जदारतर्फे दाखल विवाह नोंदणी प्रमाणपत्र हे विवाह निबंधक कार्यालय यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत असुन सदर प्रमाणपत्र बनावट व खोट असल्याचे दर्शविण्याकरीता वि.प. तर्फे याघडीला कोणताही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच, प्रस्तुत प्रकरणात संरक्षण अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दाखल केलेला असुन त्यामध्ये देखील अर्जदार व वि.प.क्र.१ हे पती-पत्नी असल्याची बाब नमुद केलेली आहे. त्यामुळे, सदर विवाह नोंदणी प्रमाणपत्रानुसार आणि दाखल कौटुंबिक घटना अहवालानुसार अर्जदार व वि.प.क्र.१ यांचा विवाह झालेला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

७. याशिवाय, अर्जदार हिने तिचे कथन शाबीत करणेकरीता अर्जदार व वि.प. क्र.१ यांचे लग्नातील व लग्नानंतरची छायाचित्रे दाखल केलेली असुन अर्जदार हिचा विवाहनंतरचा वि.प.क्र.१ हे तिचे पती असल्याचा त्याच्या नांवाचे आधारकार्ड दाखल केलेले आहे. सदर छायाचित्रे व आधारकार्डवरुन देखील अर्जदार व वि.प.क्र.१ यांचे दरम्यान विवाह झाल्याची बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. यासंदर्भात, वि.प. तर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार हिने दाखल केलेला पुरावा हा संगणकीय पुरावा असुन तो शाबीत करण्याकरीता भारतीय पुरावा कायदा कलम ६५-ब प्रमाणे प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात, त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे *Arjun Panditrao Khotkar Vs. Kailas Kushanrao Gorantyal & Ors. (2020) 7 SCC 1* या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे.

८. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार तर्फे दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन सदर कागदपत्रे ही मुळ कागदपत्रांवरुन त्याच्या प्रती काढलेल्या असल्याचे दिसुन येत असुन सदर कोणताही दस्त हा संगणकीय असल्याचे दिसुन येत नाही. शिवाय, याघडीला वर कथन केल्याप्रमाणे अर्जदार अथवा वि.प. यांनी त्यांची कथने ही सबळ पुराव्यानिशी शाबीत करणे अपेक्षित नसुन सदर पुरावा मुळ अर्ज पुराव्याला लागल्यानंतर दाखल करणे अपेक्षित आहे. त्यामुळे, केवळ अर्जदाराने प्रमाणपत्र दाखल केलेले नसल्याने सदर दाखल मुळ कागदपत्रांच्या प्रती यावेळी प्रथमदर्शनी पुरावा म्हणुन नाकारता येणार नाही. त्यामुळे, वि.प.तर्फे दाखल न्यायनिर्णयातील व प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती भिन्न असल्याने सदर न्यायनिर्णयातील निरिक्षणे या प्रकरणास लागू होत नाहीत.

९. याऊलट, वि.प. यांनी अर्जदार व वि.प.क्र.१ हे पती-पत्नी नसल्याची बाब शाबीत करणेकामी वि.प.क्र.१ यांनी बेळगाव येथील न्यायालयात दाखल दाव्याची साक्षांकीत प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीवरुन तो दावा वि.प.क्र.१ याने प्रस्तुत अर्जदार व तिचे आईवडीलांविरुध्द वि.प.क्र.१ हे अविवाहीत असुन त्याचे अर्जदारासोबत कोणतेही कायदेशिर संबंध नसल्याचे ठरवुन मिळणेकरीता दाखल केल्याचे दिसुन येते. परंतु, सदर दाव्यामध्ये अर्जदार व वि.प.क्र.१ हे पती-पत्नी नसल्याचे अथवा त्यांचेदरम्यान कोणतेही कायदेशिर नातेसंबंध नसल्याचे अद्यापही शाबीत झालेले नसुन सदर दावा प्रलंबीत आहे. त्यामुळे, केवळ वि.प.क्र.१ याने दिवाणी दावा दाखल केला यावरुन अर्जदार व त्याचे दरम्यान वैवाहिक संबंध नाहीत असे याघडीला गृहित धरता येणार नाही.

याव्यतिरिक्त, वि.प. यांनी इतर कोणताही पुरावा याघडीला दाखल केलेला नाही. त्यामुळे, वरनमुद प्रमाणे अर्जदार हिने दाखल केलेल्या पुराव्यावरुन प्रथमदर्शनी अर्जदार व वि.प.क्र.१ यांचेदरम्यान वैवाहिक नातेसंबंध असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, अधिनियम २००५ चे कलम २(च) मध्ये नमुद व्याख्येप्रमाणे अर्जदार व वि.प.क्र.१ यांचे कौटूंबिक नातेसंबंध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, मी प्रश्न क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ करीता</u> -**

१०. वर नमुद प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष, अर्जदारचा अंतरिम पोटगी मिळण्यासाठीचा अर्ज आणि त्यावरील वि.प. यांनी दिलेल्या खुलास्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार व वि.प. क्र.१ यांचे दरम्यान कौटूंबिक नातेसंबंध असून इतर वि.प. हे वि.प. क्र.१ याचे नातेवाईक आहेत. दोन्ही बाजुंचे युक्तीवाद व परिस्थितीवरुन हे निश्चित होते की, अर्जदार आणि वि.प. यांनी परस्परविरोधी कथने केलेली आहेत. आज रोजी अर्जदार ही वि.प. यांचेपासुन वेगळी राहत आहे व वि.प. यांनी अर्जदारवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सांगितले आहे. म्हणुन प्रथमदर्शनी अर्जदार ही महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्यानुसार पिडीत व्यक्ती असल्याचे दिसुन येते.

११. अंतरिम पोटगीच्या अर्जाच्या वेळी अर्जदाराने केलेले कथन सिध्द करणे अपेक्षित नाही. तसेच, वि.प. यांनी सुध्दा त्यांचेविरुध्द किंवा त्यांनी केलेले कथन सिध्द करणे अपेक्षित नाही. यावेळी केवळ अर्जदाराने केलेल्या अर्जामध्ये महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे तरतुदींप्रमाणे प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार दिसुन येतो काय हे महत्वाचे आहे. अर्जामध्ये व दाखल कौटूंबिक घटना अहवालामध्ये नमुद प्रमाणे वि.प. यांनी अर्जदारला किरकोळ कारणांवरुन त्रास देणे, अपमानीत करणे, दारु पिऊन मारहाण करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, शिवीगाळ करणे, मानसिक त्रास देणे, पैशाची मागणी करणे व अर्जदार वेगळी राहत असलेपासून तिचे उपजिवीकेची कोणतीही सोय न करणे या सर्व घटनांवरुन असे दिसुन येते की, ही सर्व कौटुंबिक हिंसाचाराचीच कृत्ये आहेत. म्हणुन, प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वि.प. यांनी अर्जदारविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केलेले आहे.

१२. वि.प. तर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार हिचेवर कौटुंबिक

हिंसाचार झाला ही बाब सबळ पुराव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी ही अर्जदाराची असुन अर्जदाराने त्याप्रमाणे तिचे कथन शाबीत केलेले नाही. याकरीता, त्यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे *Sunil Gangadhar Kadam & Ors. Vs. Jayashree Sunil Kadam & Anr., Criminal Revesion Application No.233/2018* या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मा. न्यायालयाने असे निरिक्षण दिलेले आहे की, अधिनियम २००५ प्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली कोणतेही मागणी मंजुर करण्यापूर्वी अर्जदार हिने तिचे अर्जातील कथन हे शाबीत करणे आवश्यक आहे. परंतु, सदर दाखल न्यायनिर्णयातील प्रकरणामध्ये अर्जदार हिने तिचा अर्ज पुराव्याला लागलेला असताना पुराव्यादरम्यान आणि तिच्या उलटतपासादरम्यान केलेल्या कथनांवरुन कौटुंबिक हिंसाचार शाबीत होत नसल्याचे मा. न्यायालयाने निरिक्षण दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप अर्जदाराचा पुरावा सुरु झालेला नसुन प्रस्तुत प्रकरणत हे प्राथमीक स्थितीतच आहे. तसेच, प्रस्तुतचा अर्ज हा दरम्यानचे पोटगीकरीता दाखल करण्यात आलेला असुन याघडीला अर्जदाराने तिचा सरतपास अथवा उलटतपास दिलेला नाही. त्यामुळे, अर्जदार हिने केलेले कथन सरतपास अथवा उलटतपासाने याघडीला शाबीत करणे आवश्यक नसुन ते अर्जाचे अंतिम निकालाचे वेळी दाखल पुराव्यावरुन ठरविता येईल. त्यामुळे, वि.प. तर्फे दाखल न्यायनिर्णय व प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती भिन्न असल्याने सदर न्यायनिर्णयातील निरिक्षणे या प्रकरणास लागू होत नाहीत. त्यामुळे, वरनमुद प्रमाणे अर्जदार हिने तिचे अर्जात केलेल्या कथनांवरुन आणि संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेल्या कौटूंबिक घटना अहवालावरुन प्रथमदर्शनी वि.प. यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब दिसुन येते. त्यामुळे, मी प्रश्न क्र.२ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

**<u>प्रश्न क्र.३ करीता</u> -**

१३. आज रोजी अर्जदार ही वि.प. यांचेसोबत राहत नाही. प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर चालून अंतिम निकाल होणेकरीता कालावधी लागणार आहे. त्यामुळे, अंतरिम स्थितीमध्ये दोन्ही बाजुंतर्फे दाखल कागदपत्रे, शपथपत्रे व कथनांवरुन असे दिसुन येते की, अर्जदार ही वि.प. क्र.१ याचेपासुन वेगळे राहत असल्यापासुन वि.प. क्र.१ याने तिच्या पालन पोषणाची व उदरनिर्वाहाची त्याची नैतीक जबाबदारी असताना ती पार पाडलेली नाही. तसेच, अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. म्हणून, अर्जदार

पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१४. दोन्ही बाजुंच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, अर्जदाराने नि.६ वरील उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्रात वि.प. क्र.१ हा बर्कलेज ग्लोबल सर्व्हीस सेंटर, पुणे येथे नोकरीस असून त्याला दरमहा रक्कम रु. ८५,०००/- इतका पगार मिळतो. तसेच, वि.प. यांची शेती व घर मिळकत असून त्यापासुन देखील उत्पन्न मिळते. वि.प.क्र.२ हे सेवानिवृत्त असुन त्यांना निवृत्तीवेतन मिळत असुन वि.प.क्र.४ यांचा स्वतंत्र व्यवसाय असुन त्यास देखील उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. तसेच, वि.प. क्र.१ याचेवर अर्जदारव्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबुन नसल्याचे कथन केले आहे. परंतु, तिने तिच्या कथनांच्या पृष्ट्यर्थ वि.प. याचे उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे, केवळ अर्जदाराने तिच्या शपथपत्रामध्ये नमुद केले म्हणुन वि.प. यांचे उत्पन्न तिने सांगितले आहे तेवढे समजता येणार नाही.

१५. तसेच, वि.प.क्र.१ याने नि.१६ वर त्याचे उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाबाबत शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्याने त्याचे मासिक उत्पन्न रक्कम रु.९,३००/- असुन त्याचेकडे घर मिळकत असल्याचे कथन केले आहे. तसेच, वि.प. यांनी वि.प.क्र.१ याचे पगारपत्रक, वि.प. यांच्या नांवे असलेल्या एकूण शेतीचे उतारे व घराचा उतारा दाखल केलेला आहे. त्यामुळे, वि.प. यांनी दाखल शपथपत्र व कागदोपत्री पुराव्यावरुन वि.प.क्र.१ यास उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येते. सदर कागदोपत्री पुराव्यावरुन जरी वि.प.क्र.१ यास अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे निश्चित उत्पन्न असल्याचे दिसुन येत नसले तरी वि.प.क्र.१ यास उत्पन्नाचे साधन असुन इतर वि.प. यांना देखील स्वतंत्र उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१६. एकंदरित अभिलेखावर आलेल्या बाबींवरून अर्जदार हिने कथन केल्याप्रमाणे वि.प.क्र.१ याचे उत्पन्नाबाबत जरी अर्जदार हिने ठोस पुरावा अभिलेखावर नसला तरी वर नमुद प्रमाणे वि.प.क्र.१ यांनी दाखल केलेले शपथपत्र व कागदपत्रांवरुन त्यांना उत्पन्नाचे साधन असल्याने त्यांची अर्जदार हिचे पालनपोषन करण्याची जबाबदारी असल्याने तिला पोटगी करीता रक्कम देणे अपेक्षीत आहे. परंतु, वि.प. यांचे निश्चित उत्पन्न अभिलेखावर याघडीला दाखल नसलेमुळे अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे दरमहा रक्कम

रु.१५,०००/- अंतरिम पोटगीची केलेली मागणी अवास्तव वाटते. अंतरिम पोटगी मंजुर करताना न्यायालयाने अर्जदाराच्या जीवनावश्यक गरजा तसेच दोन्ही पक्षकारांतील समाजातील स्थान याचा विचार करुन अर्जदाराला किती पोटगी देणे न्यायोचित राहील हे ठरवणे महत्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही बाजुंतर्फे केलेले कथन व दाखल पुराव्यावरुन वि.प.क्र.१ यास व इतर वि.प. यांना स्वतंत्र उत्पन्नाचे साधन असल्याने त्यांची जबाबदारी वि.प.क्र.१ याचेवर नसल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, वर नमुद सर्व विवेंचनावरुन अर्जदार हिला पोटगी म्हणुन रक्कम रु.५,०००/- देणे योग्य होईल. त्यानुसार, मी प्रश्न क्र.३ चे उत्तर त्याप्रमाणे दिलेले आहे.

**प्रश्न क्र.४ करीता** -

१७. वर नमुद सर्व स्पष्टीकरण व प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष लक्षात घेता अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. वि.प. क्र.१ याने अर्जदारकडे दुर्लक्ष केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यामुळे अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन पोटगी देणे योग्य होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास येणा-या खर्चाचा विचार मुख्य अर्ज निकाली काढताना विचारात घेता येईल. सबब, प्रश्न क्र.४ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. वि.प.क्र.१ सुरज रामचंद्र जाधव याने प्रस्तुत अर्ज दाखल दिनांक २०/०४/२०२३ पासुन या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अर्जदारला अंतरीम पोटगी दरमहा रक्कम रु. ५,०००/-(अक्षरी रुपये पाच हजार मात्र) द्यावी असा त्यास हुकुम करण्यात येत आहे.

०३. प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही बाजुंना मोफत देण्यात यावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.06.06 17:18:17 +0530

दिनांकः ०६/०६/२०२४.
गडहिंग्लज.

**( एस. ए. राठोड )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 06/06/2024 |
| Order signed by P.O. on | 06/06/2024 |
| Order uploaded on | 06/06/2024 |